लोकसत्ता पुणे
20 जाने 20

# सेवा घेणारा सेवा देणारा व्हावा

## सुहासराव हिरेमठ यांचे प्रतिपादन

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** समाजातील पीडित, वंचितांसाठी सेवाकार्य चालवली पाहिजेत. संपूर्ण समाज सुखी, संपन्न होण्यासाठी सेवाकार्यांची नितांत आवश्यकता आहे, पण आपण आज ज्यांची सेवा करत आहोत, तो उद्या सेवा करणारा कसा होईल याकडेही लक्ष देण्याची गरज आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य सुहासराव हिरेमठ यांनी रविवारी केले.



राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे भरविण्यात आलेल्या 'सेवा संगम' प्रदर्शनाच्या समारोप कार्यक्रमात रितू छाब्रिया यांचा सत्कार डॉ. प्रवीण दबडघाव यांनी रविवारी केला. अनिल व्यास, सुहासराव हिरेमठ, डॉ. रवींद्र साताळकर आणि सोमदत्त पटवर्धन या वेळी उपस्थित होते.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे विविध सेवा कार्यांची माहिती देणाऱ्या 'सेवा संगम' या प्रदर्शनाच्या समारोप कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून हिरेमठ बोलत होते. मुकुल माधव फाउंडेशनच्या अध्यक्ष आणि प्रसिद्ध उद्योजिका रितू छाब्रिया कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. छाब्रिया यांचे स्वागत संघाचे प्रांत कार्यवाह डॉ. प्रवीण दबडघाव यांनी, तर हिरेमठ यांचे स्वागत जनकल्याण समितीचे अध्यक्ष डॉ. रवींद्र साताळकर यांनी केले. अनिल व्यास, मंगेश घाटपांडे, सोमदत्त पटवर्धन, मनीषा जोशी या वेळी व्यासपीठावर उपस्थित होत्या.

'त्याग आणि सेवा हे भारतीयांचे सर्वश्रेष्ठ आदर्श आहेत. त्यामुळे भारतीयांना सेवेची शिकवण देण्याची गरज नाही', या स्वामी विवेकानंद यांच्या वचनाची आठवण देत हिरेमठ म्हणाले की, संघाच्या माध्यमातून देशात दीड लाख सेवाकार्य सुरू आहेत. त्या बरोबरच सेवाभाव आणि कर्तव्यभावनेने अशाच प्रकारची आणखी सुमारे २० ते २५ लाख सेवाकार्य विविध व्यक्ती आणि संस्थांतर्फे चालवली जात आहेत. विविध प्रकारची आवश्यक सेवाकार्य करणे, त्याबरोबरच ज्याची सेवा करत आहोत तो स्वावलंबी बनेल हे पाहणे हे सेवा कार्यकर्त्यांचे काम आहे.

समर्पण, समाजाप्रती भक्ती आणि अनुशासन ही संघ कार्याची तीन महत्त्वाची वैशिष्ट्ये असल्याचे रितू छाब्रिया यांनी सांगितले. सेवाकार्ये मनापासून, त्यागमय भावनेतून आणि सेवावृत्तीने केली गेली पाहिजेत असेही त्या म्हणाल्या.

शैलेंद्र बोरकर यांनी प्रास्ताविक केले. सुवर्णा उपलप यांनी सूत्रसंचालन केले.

## कार्यशाळांना भरघोस प्रतिसाद

सेवा संगम प्रदर्शनाला दोन दिवसांमध्ये हजारो पुणेकरांनी भेट देऊन विविध १२५ सेवाकार्यांची माहिती घेतली. तसेच विविध संस्थांच्या कार्यामध्ये सहभागी होण्याचीही इच्छा व्यक्त केली. वारली चित्रकला, पारंपरिक कला, कुंभारकाम, कागदी पिशव्यांची निर्मिती अशा विविध विषयांवरील कार्यशाळांना नागरिकांकडून भरघोस प्रतिसाद मिळाला.